# संख्यांचा लहानमोठेपणा व चढता–उतरता क्रम

**समजून घेऊया**

## संख्यांचा लहानमोठेपणा

- **४५९ व ८६१ यांमधील लहानमोठेपणा समजून घेऊ.**

  ४५९ या संख्येत शतक स्थानी असलेल्या ४ ची किंमत ४०० व ८६१ या संख्येत शतक स्थानी असलेल्या ८ ची किंमत ८०० आहे. त्यामुळे ४५९ ही संख्या ८६१ या संख्येपेक्षा लहान आहे.

  म्हणजे ४५९ लहान ८६१ पेक्षा → ४५९ < ८६१

  किंवा ८६१ मोठी ४५९ पेक्षा → ८६१ > ४५९

- **४५१ व ४२९ यांमधील लहानमोठेपणा समजून घेऊ.**

  आता ४५१ व ४२९ या संख्यांपैकी दोन्ही संख्यांमध्ये शतकाच्या स्थानी ४ हा अंक समान असल्यामुळे आपण दशक स्थानी असलेल्या अंकांची तुलना करू.

  ४५१ मध्ये दशक स्थानी ५ हा अंक आहे. म्हणून ५ ची स्थानिक किंमत ५० व ४२९ मध्ये दशक स्थानी २ हा अंक आहे. म्हणून २ ची स्थानिक किंमत २० आहे. ५० ही संख्या २० पेक्षा मोठी आहे.

  ४५१ मोठी ४२९ पेक्षा → ४५१ > ४२९

  योग्य चिन्ह लिही

  ४२९ ☐ ४५१

- **६५२ व ६५८ यांमधील लहानमोठेपणा समजून घेऊ.**

  आता ६५२ व ६५८ या संख्यांमध्ये शतक व दशक स्थानी समान अंक असल्यामुळे आपण एककस्थानी असलेल्या अंकांची तुलना करू.

  ६५२ मध्ये एकक स्थानी २ अंक आहे. म्हणून २ ची स्थानिक किंमत २ आहे.

  ६५८ मध्ये एकक स्थानी ८ अंक आहे. म्हणून ८ ची स्थानिक किंमत ८ आहे.

  २ ही संख्या ८ पेक्षा लहान आहे म्हणून ६५२ ही संख्या ६५८ पेक्षा लहान आहे.

  ६५२ लहान ६५८ पेक्षा → ६५२ < ६५८

  योग्य चिन्ह लिही

  ६५८ ☐ ६५२

## सोडवून पाहूया

- **खाली दिलेल्या अंकांतील एक अंक एकदाच वापरून तीन अंकी लहानात लहान व मोठ्यात मोठी संख्या तयार कर.**


| अ.क्र. | अंक | लहानात लहान संख्या | मोठ्यात मोठी संख्या |
|---|---|---|---|
| १) | २, ४, ७ | २४७ | ७४२ |
| २) | ४, ३, २ | | |
| ३) | १, ०, ९ | | |
| ४) | ८, ५, ० | | |


- **खाली दिलेल्या संख्यांची चढत्या व उतरत्या क्रमाने मांडणी कर.**

| अ.क्र. | संख्या | चढता क्रम | उतरता क्रम |
|---|---|---|---|
| १) | ५६३, ७४६, ३८६ | ३८६, ५६३, ७४६ (सर्वांत लहान आधी, सर्वांत मोठी शेवटी) | ७४६, ५६३, ३८६ (सर्वांत मोठी आधी, सर्वांत लहान शेवटी) |
| २) | ९०२, ८७०, ९९० | | |
| ३) | ५४२, ४५२, ५४८, ५२० | | |


## सराव करूया


- खाली दिलेल्या अंकांचा एकदाच वापर करून तीन अंकी जास्तीत जास्त संख्या तयार कर व त्या संख्यांची चढत्या व उतरत्या क्रमाने मांडणी कर.


१) 


२) 


३) 


४) 


५) 


६) 


- सर्वांत मोठ्या संख्येला रिंगण कर.

१) ४ दशक, २ शतक , ९ एकक

२) ४५६, ४६५, ४०६

३) ३७५, ४७५, २७५

४) ७८९, ७८८, ७८७

५) ६६०, ६३०, ६०३

६) ४ दशक, ३ शतक, ६० एकक

७) ६७ दशक, ६ शतक, ७०० एकक

८) २० दशक, ३० एकक, २५ एकक